(फक्त सभासदांसाठी) सभा नोटीस

जावक क्र. 06/2024–25

तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेट को–ऑप.क्रे सो.ली.माजलगाव जि.बीड सर्व सन्मानीय सभासदांना कळविण्यात येते कि, संस्थेची 13 वी वार्षिक सर्व साधारण सभा संस्थेचे विद्यमान अध्यक्ष मा.श्री शेजुळ चंद्रकांत प्रकाशराव यांचे अध्यक्षतेखाली दि. 22/09/2024 वार रविवार रोजी श्री व्यंकटेश मंगल कार्यालय गडी रोड,,माजलगांव ता.माजलगाव जि.बीड या ठिकाणी सकाळी ठिक 11:00 वाजता खालील विषयाचे कामकाज करण्यासाठी आयोजीत करण्यात आलेली आहे. तरी या सभेस सर्व सन्माननिय सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे हि नम्र विंनती.

विषय पत्रिका

1. दिनांक 24 सप्टेंबर 2023 रोजीच्या वार्षीक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचुन कायम करणे.
2. मा.संचालक मंडळाने सन 2023-24 आर्थिक वर्षाचा तयार केलेला वार्षिक अहवाल , 31 मार्च 2024 अखेरचा ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रक वाचुन कायम करणे व त्यास मान्यता देणे.
3. सन 2023-24 अखेर झालेल्या नफ्याची मा.संचालक मंडळाने सुचविल्यानुसार विभागणी प्रस्तावास मान्यता घेउन भागांवरील लाभांशास मंजुरी घेणे.
4. सन 2024-25 सालच्या पुरवणी अंदाजपत्रकास व सन 2023-24 मधील अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी घेणे.
5. मा.केंद्रीय निबंधक नवी दिल्ली यांनी दिलेल्या आदर्श उपनिधीप्रमाणे व नविन मल्टीस्टेट कायदयामध्ये झालेल्या बदलाप्रमाणे उपविधीमध्ये दुरूस्ती करण्याबाबत सभेमध्ये चर्चा करणे व मान्यता घेणे बाबत.
6. सन 2024-25 सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षकाची नियुक्ती व त्यांचे मानधन ठरविणे बाबत निर्णय घेणे.
7. सन 2022-2023 चे वैधानिक लेखापरिक्षणातील अहवाल दोष दुरूस्तीस मा.संचालक मंडळाने दिलेल्या मंजुरीस मान्यता घेणे.
8. सन 2023-24 चे वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेउन स्वीकृत करणे.
9. सन 2022-23 आयकर लेखा परिक्षण आणि जि.एस.टी लेखा परिक्षण अहवालाची नोंद घेउन स्वीकृत करणे.
10. संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांच्याकडुन येणे असलेल्या कर्जाची माहिती घेणे.
11. सन 2023-24 या आर्थिक वर्षात थकित असलेल्या कर्जदारांना सवलत देउन खाते बंद करणे तसेच काही कर्ज खाते पुनर्गठीत/पुनर्रचना /पुर्णलिखीत /निर्लेखीत करण्यास मान्यता घेणे.
12. नविन कर्ज धोरण (पॉलीसी) व ठेव धोरण (पॉलीसी) यास मान्यता देणे.
13. कर्नाटक राज्यामध्ये संस्थेची शाखा चालु करण्यासाठी मान्यता प्रस्ताव सादर करणे व मंजुरी घेणे.
14. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) कायदा 2013 नुसार संस्थेचे धोरण (POSH POLICY) गठीत अंतर्गत तक्रार समितीस मान्यता घेणे.
15. सन 2023-24 आर्थिक वर्षातील कर्मचारी वेतश्रेणी ,दिपावली बोनस , प्रोत्साहन पर बक्षीस , शैक्षणीक खर्च , कर्मचारी पालक पेंशन ,आरोग्य व अपघाती विमा खर्चास मान्यता देणे.
16. संस्थेच्या बोरी , छ.शिवाजी चौक माजलगाव ,आळंदी ,जवळा बाजार व अंबाजोगाई शाखेच्या स्थलातंरास मान्यता देणे.
17. संस्थेच्या परभणी , नांदेड व सोनपेठ शाखेचे नुतनिकरण करण्यास झालेल्या खर्चास मान्यता देणे.

18. संस्थेच्या वसमत ,मानवत ,आष्टी ,मंठा व तिर्थपुरी या नविन शाखेच्या उभारणी करीता झालेल्या खर्चास मान्यता घेणे.
19. मान्यता प्राप्त 10 शाखा पैकी 4 शाखेचे कार्यक्षेत्र बदलण्यास मान्यता घेणे.
20. वार्षीक सर्वसाधारण सभेस अनुपस्थिती सभासदांची अनुपस्थिती क्षमायापीत करणे.
21. मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने ऐनवेळी येणा–या विषयावर चर्चा करूण मंजुरी देणे.

दिनांकः– 28 / 08 / 2024
ठिकाणः– माजलगाव

मा.संचालक मंडळाच्या आदेशावरून
शेजुळ शहाजी अच्युतराव
मुख्यकार्यकारी अधिकारी
तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेट को–ऑप.के्र सो.ली.माजलगाव

टिप :–

1) गणपुर्तीअभावी तहकुब झालेली वार्षीक सर्वसाधारण सभा त्याच दिवशी नमुद केलेल्या जागी एक तासानंतर घेण्यात येईल.या सभेस गणपुर्तीची व वेगळया सुचनेची आवश्यकता राहणार नाही

2) ज्यासभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेत काही प्रश्न अथवा सुचना मांडावयाच्या असतील तर त्यांनी आपल्या लेखी सुचना व प्रश्न 15 दिवसाच्या आत मुख्यकार्यालयामध्ये संस्थेच्या कार्यालयीन वेळेत पाठवावीत.